# फोनपेने व्यापाऱ्यांना कर्जासाठी प्लॅटफॉर्म लाँच केला

बंगलुरू, दि.२६ : फोनपे ने त्यांचा मर्चंट लेंडिंग प्लॅटफॉर्म लाँच केल्याची घोषणा केली हा प्लॅटफॉर्म फोनपेच्या ३.५ कोटीपेक्षा जास्त व्यापाऱ्यांच्या विस्तृत मर्चंट बेसला पूर्णपणे डिजीटल आणि सुलभ पद्धतीने कर्ज प्रदान करण्यासाठी बँका आणि NBFC (नॉन-बँकिंग फायनांशियल कंपन्या) ला सक्षम करतो. हे लाँच फोनपेची लहान आणि मध्यम उद्योगांच्या (SME) वित्तीय समावेशनाच्या वचनबद्धतेची पुन्हा पुष्टी करते. भारतातील लहान आणि मध्यम आकाराच्या उद्योगांनी (SME) संघटीत कर्ज मिळवण्यात दीर्घकालीन आव्हानांचा सामना केला आहे ज्यामुळे त्यांच्या वाढीस आणि क्षमतेस अडथळा येत होता. ही अपूर्ण गरज समजून घेऊन, फोनपे ने फोनपे फॉर बिझनेस पवर एक सुलभ आणि संपूर्ण कर्ज प्रदानाचा प्रवास डिझाइन केला आहे, ज्याच्याद्वारे कर्जदाता भागीदारांद्वारे अगदी काही मिनिटांत व्यापाऱ्यांना कर्ज मंजुर केली जातात. यासाठी फोनपे द्वारे त्यांच्या मजबूत वितरण नेटवर्क आणि श्रेष्ठ टेक्निकल क्षम तांचा वापर केला जातो तर कर्जदाता भागीदार त्यांचे अंडररायटिंग, वितरण आणि कर्ज संकलनाच्या कौशल्यांचा वापर करतात.

मे २०२३ पासून फोनपे ने त्यांच्या विश्वासार्ह NBFC भागीदारांच्या माध्यमातून २०,००० पेक्षा जास्त कर्जाचे यशस्वीरित्या वितरण केले आहे. प्रारंभीच मिळालेला हा अभूतपूर्व प्रतिसाद, लहान आणि मध्यम उद्योगांदरम्यान (SME) असलेली कर्जाची प्रचंड मागणी आणि ही गरज भागवण्यासाठी फोनपेच्या म र्केटप्लेस मॉडेलची परिणामकारकता याकडे लक्ष वेधते. फोनपेची पेमेंट बिझनेसमध्ये व्यापारी सोबतची म जबूत प्रतिबद्धता त्यांचे वेगळेपण दर्शवणाऱ्या वैशिष्ट्यांपैकी एक आहे. व्यापारीच्या व्यवहार वर्तनाप्रति कंपनीची परिपूर्ण समज एक मजबूत परिमाण आहे जे व्यापाऱ्यांच्या व्यवसायाच्या स्थितीस प्रमाणित करते. याशिवाय, अत्याधुनिक डेटा विज्ञान-चालित मॉडेलचा वापर करून फोनपे सक्रियपणे स्वतःचा क्रेडिट स्कोर विकसित करत आहे जे भागीदारांद्वारे कर्ज प्रक्रियेत करण्यात अधिक वाढ करते आणि SME ला सुलभतेने कर्ज मिळवण्यास सक्षम करते.

# शूलिनी युनिव्हर्सिटी खासगी भारतीय विद्यापीठांमधील मेलबर्न युनिव्हर्सिटीची पहिली ड्युएल- डिग्री पार्टनर

मुंबई, दि.२६ : ड्युअल डिग्री भागिदारीअंतर्गत शूलिनी युनिव्हर्सिटी या भारतातील आघाडीच्या खासगी विद्यापीठाने प्रतिष्ठित मेलबर्न युनिव्हर्सिटीशी भागिदारी केली आहे. यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षण घेण्याची अनोखी संधी मिळणार आहे. एखाद्या खासगी विद्यापीठाशी ड्युएल डिग्री अभ्यासक्रमासाठी भागिदारी करण्याची ही मेलबर्न युनिव्हर्सिटीची पहिलीच वेळ असून त्यावरून शूलिनी युनिव्हर्सिटीची ख्याती कळून येते.

प्रतिष्ठित टाइम्स हायर एज्युकेशन (टीएचई) वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग्जनुसार शूलिनी युनिव्हर्सिटी भारतातील पहिल्या क्रमांकाचे खासगी विद्यापीठ आणि देशातील एकंदरीत दुसऱ्या क्रमांकाचे विद्यापीठ आहे, तर ऑस्ट्रेलियातील मेलबर्न युनिव्हर्सिटी देशातील पहिल्या क्रमांकाचे आणि जगभरातील ३४ वे विद्यापीठ आहे. या भागिदारीमुळे शैक्षणिक गुणवत्ता आणि नाविन्य क्षेत्रात नवा मापदंड तयार झाला आहे. बॅचलर ऑफ सायन्स अडव्हान्स्ड (ऑनर्स) या ड्युएल डिग्री अभ्यासक्रम ।अंतर्गत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण पुरवले जाईल आणि खऱ्या अर्थाने जागतिक शिक्षणाच्या अनुभवाची द्वारे खुले होतील. या महत्त्वाकांक्षी कराराअंतर्गत भारतीय विद्यार्थ्यांना ड्युएल डिग्री अभ्यासक्रमाचे सर्व लाभ मिळतील. पर्यायाने त्यांना देशातील तसेच मेलबर्न युनिव्हर्सिटीमध्ये शास्त्र शाखेच्या पदवीचा अभ्यास करता येईल. या क्रांतीकारी अभ्यासक्रमाचा कालावधी २ वर्षांचा असून शूलिनी युनिव्हर्सिटीमध्ये त्याची सुरुवात होईल व त्यानंतर मेलबर्न येथे २ वर्ष अभ्यास करता येईल. तिसऱ्या व चौथ्या वर्षात विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या शाखांच्या मेजरसमधून निवड करता येईल. त्यात शेती, शाश्वतता आणि पर्यावरण, जैवशास्त्र आणि कम्प्युटर सायन्स यांचा समावेश असेल.

# नवीन संचालक मंडळ गणेश कारखान्याला पुन्हा वैभव प्राप्त करून देईल - बाळासाहेब थोरात

अहमदनगर, दि. २६ : गणेश कारखाना हा राहता तालुक्याची कामधेनू असून मागील आठ वर्षांपासून या कारखान्याची प्रगती थांबली होती.ऊस उत्पादकांचे मोठे हाल होत होते.नुकत्याच झालेल्या निवडणुकीत सभा सदांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवत संगमनेर व संजीवनी प्रमाणे हा कारखाना चालवून नवीन संचालक मंडळ हे गणेश कारखान्याला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देईल असा विश्वास विधिमंडळ पक्षाचे नेते आ. बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला आहे.



सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या अतिथी गृहावर गणेश कारखान्याच्या सर्व नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना आ. थोरात म्हणाले की, गणेश परिसरातील सभासदांनी निवडणुकीत गणेश परिवर्तन पॅनलवर मोठा विश्वास दाखवला आहे. नवीन निवडलेले संचालक मंडळ हे जुन्या नव्यांचा मेळ असून या कार्यक्षेत्रातील सम स्यांची जाणीव असणारे आहे. कार खान्याच्या उत्तम व्यवस्थापनाबरोबर सभासदांना चांगला भाव देणे व कारखान्याला पुन्हा वैभव प्राप्त करून देणे यासाठी सर्व संचालकांनी काम करावे. राहता तालुका हा पूर्वी वैभवशाली व समृद्ध तालुका होता. मात्र अनेक दिवसां पासून या तालुक्याची प्रगती थांबलेली आहे. शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. गणेश परिसरातील ऊस उत्पादक नेहमी संगमनेर व संजीवनी कडे ऊस द्यावा यासाठी आग्रही असायचे. आता या उसाचे गणेश कारखा न्यातच गाळप केले जाणार असून हा कारखाना पुन्हा आपला सुवर्णकाळ पाहिल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. युवा नेते विवेक भैय्या कोल्हे म्हणाले की, आमदार बाळासाहेब थोरात हे राज्यातील सहकारातील अत्यंत आदरर्शवत व्यक्तिम त्व आहे. सहकार महर्षी शंकरराव कोल्हे यांच्या विचारांवर गणेश कारखाना सक्षमपणे चालवला जाईल असा विश्वास व्यक्त करताना नवीन संचालक मंडळाला त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# दापोली अपघातातील मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाखाची मदत - उदय सामंत

रत्नागिरी, दि.२६ : आसूद (ता. दापोली) येथे काल झालेल्या अपघातातील मृतांच्या एका वारसाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत दिली जाणार असल्याची माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली. ट्रक आणि वडाप यांची समोरासमोर टक्कर झाल्याने काल झालेल्या भीषण अपघातात ८ जण मृत्युमुखी पडले. दापोली-हर्णे राज्य म ार्गावर आसूदच्या जोशी आळीजवळील वळणावर काल (दि. २५ जून) दुपारी साडेतीनच्या सुमारास ट्रक आणि टाटा मॅजिक प्रवासी जीप यांची समोरासमोर टक्कर होऊन चालकासह पाच जणांचा मृत्यू झाला, तर उपचार सुरू असताना तिघांचा रात्री उशिरा मृत्यू झाला.

# एक वेतनवाढ कायमस्वरूपी रोखण्यासोबत तत्काळ बदलीची शिफारस

अमरावती, दि. २६ : अमरावती जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी विजय कविटकर यांच्यावर काही महिला कर्मचाऱ्यांनी गंभीर आरोप केल्याने विशाखा समितीने चौकशी करून सीईओंना अहवाल सादर केला. यामध्ये कविटकर यांची कायमस्वरूपी एक वेतनवाढ रोखण्यात यावी व त्यांची तातडीने इतरत्र बदली करण्याची शिफारस केलेली आहे.दरम्यान झेडपी सीईओ अविश्यांत पंडा यांनी हे प्रकरण गंभीरतेने घेऊन आदेश जारी केलेले आहेत. प्रकरण गोपनीय असल्याने यावर भाष्य करणे योग्य नसल्याचे स्पष्ट केले. कविटकर याने सहकारी कर्मचारी महिलेसोबत अश्लील बोलून शरीरसुखाची म ागणी ३ मे रोजी सायंकाळी केल्याचा आरोप आहे. कविटकर यांच्या नेहमीच्या जाचाला कंटाळून संबंधित महिला कर्मचाऱ्याने १२ मे रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी विशाखा समितीला अहवाल मागविला. मात्र, तीन आठवड्यानंतरही अहवाल न मिळाल्याने ३ जूनला पोलिसांनी विजय पुंडलिक कविटकर (रा. चैतन्य कॉलनी) याच्याविरुद्ध विनयभंग व ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. दरम्यान विशाखा समितीचा अहवाल प्राप्त होताच जिल्हा परिषद प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला. प्रकरणात प्रशासनाची प्रतिमा मलिन झाल्याने या कर्मचाऱ्याचा केवळ विभाग बदली न करता अन्यत्र बदली करण्याची मागणी काही महिला कर्मचाऱ्यांकडून होत आहे.


**जाहीर नोटीस**

मी, खाली सही करणार, श्री. विवेक राजेश आनंदपरा यांच्या रहेजा टाउनशिप, मालाड पूर्व, मुंबई - 400097 स्थित वृंदावन-३ को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, मधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्रमांक डी/213 बाबत मालकी हक्काचा तपास करत आहे. या नोटीसद्वारे आम जनतेस कळविण्यात येते की माझे अशिल श्रीमती पुष्पा अनिल नंदाणी व श्री. अनिल नटवरलाल नंदाणी हे, श्री. विवेक राजेश आनंदपरा यांच्या कडून त्यांची सदर सदनिका क्रमांक डी/213 खरेदी करू इच्छित आहेत.

सदर सदनिका क्रमांक डी/213 किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री, देवाणघेवाण, करार, बक्षीसपत्र, भाडेपट्टा, धारणाधिकार, शुल्क, गहाणखत, ट्रस्ट, वारसा हक्क, वहिवाटीचा हक्क, आरक्षण, बोजा, देखभाल किंवा इतर, याद्वारे कोणताही दावा/स्वारस्य असल्यास त्यांना या नोटीस/सूचनेद्वारे कळविण्यात येत आहे की त्यांनी त्यांच्या दाव्यासंबंधी हि नोटीस/ सूचना प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत मला खालील नमूद पत्यावर त्यासंबधीत योग्य त्या कागद पत्रांसहित व पुराव्यासहित संपर्क करावा व तसे करण्यापासून सदर व्यक्ती अपयशी झाल्यास सदर व्यक्तीला त्या संबंधीचा आपला दावा सोडून दिलेला आहे असे समजून माझ्या अशिलांकडून वरील फ्लॅट खरेदीविक्री व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**वितेश आर. भोईर, ( एडवोकेट)**
१०, सूरज बाली निवास, स्टेशन रोड,
रजीस्टेंशन ऑफिसच्या समोर,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई – ४०० १०४.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २७.०६.२०२३



**KRISHIVAL FOODS LIMITED**

(Formerly known as Empyrean Cashews Limited)
CIN No. L74120MH2014PLC254748
**Registered Office**: 1309, Lodha Supremus, Saki Vihar road, opp. MTNL Office, Powai, Mumbai - 400072.
**Tel no.:** +918779558264, **Website:** www.krishival.com, **Email:** info@krishival.com

**NOTICE FOR 9th ANNUAL GENERAL MEETING**

Notice is hereby given that, the 9th Annual General Meeting ("AGM") of the members of the company will be convened through Video Conferencing ("VC") / Other Audio Visual Means ("OAVM") in compliance with applicable provisions of the Companies Act 2013 and the rules notified thereunder, read with General Circular No. 14/2020 dt. 08.04. 2020, No. 17/2020 dt. 13.04.2020 and No. 20/2020 dt. 05.05.2020, No. 02/2021 dt. 13.01.2021, No. 2/2022 dated 05.05.2022, 3/2022 05.05, 2022 followed by Circular No. 10/2022 and 11/2022 dated 28.12.2022 issued by the Ministry of Corporate Affairs ('MCA Circulars') and Circular No.SEBI/HO/CFD/CMD/1/CIR/P/2020/79 dt.12.05.2020 and EBI/HO/ CFD/ CMD2/CIR/P/2022/62 dated May 13, 2022 followed by Circular No. SEBI/HO/CFD/ PoD-2/P/CIR/2023/4 dated January 5, 2023 issued by Securities & Exchange Board of India ("SEBI Circular").

The 9th AGM of the Company will be held on Saturday, July 22, 2023 at 11:00 A.M. (IST), through VC/OAVM facility provided by **Purva Sharegistry (India) Private Limited** ("Purva Sharegistry"), Register and Transfer Agent of the company, to transact the business as set out in the Notice convening the AGM. The member can attend and participate in the AGM only through VC/OAVM as no provision has been made to attend the AGM in person. The attendance through VC/OAVM will be counted for the purpose of reckoning the quorum for the AGM.

In compliance with the MCA and SEBI Circular(s), the notice setting out the business to be transacted at the AGM together with the Annual Report of the company for the year 2022-23 will be sent electronically to those members whose email address is registered with the company/ Depository participant(s). No physical copies of the notice and the Annual Report would be sent to any member. The Notice of the AGM and the Annual Report will also be available on the Company's website at www.krishival.com and on the website of Stock Exchange i.e NSE Limited at www.nseindia.com

**Manner of registering / updating email address for receiving the documents pertaining to 9th AGM**

Members may send an email request addressed to cs@krishival.com and support@purvashare.com along with scanned copy of the request letter duly signed by the first shareholder, providing the email address, mobile number, self – attested copy of PAN and Client Master copy in case shares are held in electronic form or copy of the share certificate in case shares are held in physical form, to enable Purva Sharegistry to register their address and to provide them the Notice, Annual report and the e-voting instructions along with the user ID and Password.

Kindly note that in case the shares are held in electronic form, the above facility is only for temporary registration of email address for receipt of the Notice, Annual Report and the e-voting instructions along with the user ID and Password. Such members will have to register their email address with their Depository Participants permanently, so that all communications are received by them in electronic form.

**Manner of casting vote(s) through e-voting**

Members will have an opportunity to cast their vote(s) on the business as set out in the Notice of the AGM through remote e-voting facility ("remote e-voting"). The facility for e-voting will also be made available during the AGM to those members who could not cast their vote(s) by remote e-voting. The detailed procedure for e-voting before as well as during the AGM will be provided in the Notice of the AGM.

Members who do not receive email or whose email address is not registered with the Company/ Depository Participant(s), may generate login credentials by following instructions given in the Notice of AGM. The same login credentials can also be used for attending the AGM through VC/OAVM

Members are requested to carefully read all the notes set out in the Notice of the AGM and in particular, instructions for joining the AGM and manner of casting votes through e-voting.

The company has extended the facility of electronic credit of dividend directly to the respective bank accounts of the members through electronic Clearing Services (ECS)/ National Electronic Clearing services (NECS) /Automated Clearing House (ACH)/ Real Time Gross Settlement (RTGS)/ Direct Credit/ IMPS/NEFT etc. In order to receive the dividend without any delay the Members holding shares in physical form are requested to submit particulars of their bank accounts in 'Form ISR-1' along with original cancellation cheque bearing the name of the member to RTA/company to update their bank account details and all the eligible members holding shares in demat mode are requested to update with their respective DPs before the date of book closure, their correct Bank Account number, including 9 Digit MICR code and 11 digit IFSC code, email id and mobile number, members holding shares in physical form may communicate these details to Purva Sharegistry (India) Pvt. Ltd.

In compliance with provisions of Section 108 of the Companies Act, 2013 and the rules made there under, as amended, read with SEBI (LODR) Regulations, 2015. The details of e-voting are as under:

1. Date of Dispatch of Notice – June 26, 2023
2. The e-voting period begins on July 19, 2022 at 10.00 a.m. and ends on July 21, 2023 at 5.00 p.m. During this period, shareholders of the Company holding shares as on the cut-off date i.e. July 15, 2023 may cast their vote electronically. The e-voting module shall be disabled by CDSL for voting thereafter.
3. Any person who becomes member of the company after the cut-off date may apply for e-voting login id password as per procedure which is available on www.krishival.com and www.nseindia.com.
4. Members who have cast their vote by e-voting may attend the meeting but shall not be entitled to cast their vote again.
5. The remote e-voting module shall be disabled for voting after the expiry of the date and time mentioned above. Once the vote on resolution(s) is cast by the members, the members shall not be allowed to change it subsequently.
6. The Board of Directors appointed M/s. MNB & Co. LLP, Practicing Company Secretaries as Scrutinizer to scrutinize the e-voting process in a fair and transparent manner. The results will be declared on July 24, 2023
7. Members may contact Company Secretary and Compliance Officer, on +918779558264 email at cs@krishival.com for any grievances relating to e-voting.

Notice is also hereby given pursuant to Section 91 of the Companies Act, 2013 and SEBI (LODR) Regulation that the Register of Members of the Company will be closed from July 17, 2023 to July 19, 2023 for the purpose of AGM. The record date for dividend is July 16, 2023.

**By Order of the Board of Directors**
**For Krishival Foods Limited**
**(Formerly known as Empyrean Cashews Limited)**
**Aparna Morale Bangar**
**Chairperson and Managing Director**
**DIN: 05332039**

**Date : June 24, 2023**
**Place : Mumbai**



**RANDER CORPORATION LIMITED**

CIN:L99999MH1993PLC075812
Reg. Office: 14/15, MadhavKripa,BoisarPalghar Road, Boisar (W), Palghar-401501
Tel.No. 022-35729913 | Email ID: info@randergroup.com

**Extract of Audited Financial Results for the Quarter and Year Ended on 31st March, 2023**

(Amt in Lacs)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31/03/2023 | Previous Year Quarter Ended 31/03/2022 | Year Ended 31/03/2023 | Previous Year Ended 31/03/2022 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income | 156.82 | 103.08 | 348.73 | 366.06 |
| 2 | Total Expenditure | 181.44 | 93.13 | 260.10 | 263.42 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | -24.62 | 9.95 | 88.63 | 102.64 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | -24.62 | 9.95 | 88.63 | 102.64 |
| 5 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | -18.01 | -9.99 | 66.35 | 22.17 |
| 6 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | -18.01 | -9.99 | 66.35 | 22.17 |
| 7 | Equity Share Capital | 1233.70 | 1233.70 | 1233.70 | 1233.70 |
| 8 | Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) | 862.63 | 796.31 | 862.63 | 796.31 |
| 9 | Earnings Per Share (before extraordinary items) (of Rs. 10/- each) | | | | |
| | Basic : | -0.15 | -0.08 | 0.18 | 0.18 |
| | Diluted: | | | | |

**Note:** a) The above is an extract of the detailed format of Quarterly and Yearly Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly and YearlyFinancial Results is available on the www.bseindia.com and www.randergroup.com

**For RANDER CORPORATION LTD**
**Sd/-**
**ROHAN RANDER**
**(Director)**

**Place : Mumbai**
**Date : 26.06.2023**



UNITY Small Finance Bank

**युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**

**शुद्धिपत्र**

मुंबई लक्षदीप या वृत्तपत्रात २३.०६.२०२३ रोजी प्रकाशित मागणी सूचनेचा संदर्भ घेऊन

**अ. क्र. २ कर्जदार / तारणकर्ता श्रीमती ज्योती महेंद्र पांचाल यांच्या मालमत्तेच्या वर्णन मध्ये इमारतीचे नाव "जे पी नॉर्थ आर्टिका इमारत" ऐवजी "जे पी नॉर्थ अत्रिया इमारत" असे वाचावे.**

इतर सर्व तपशीलमध्ये कोणताही बदल नाही.

**प्राधिकृत अधिकारी**
**युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**



**जाहीर सूचना**

सर्वसामान्य जनतेस येथे सूचना देण्यात येत आहे की, माझे अशील **श्रीमती हीना नरेश मकवाना** यांच्याकडून (१) मे. कोको ब्युटिक्स, त्यांचे मालक **श्रीमती माया सुगनो मंघनानी** आणि **श्रीमती दिनेशबेन तुलसीदास परमार** यांच्या दरम्यान झालेला फ्लॅट क्र.जी-३, तळमजला, श्री साई ज्योत को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. म्हणून ज्ञात इमारत, पोस्ट ऑफिस समोर, भाईंदर (पश्चिम), मुंबई-४०११०१ या जागेबाबत भागप्रमाणपत्र क्र.०३ अंतर्गत अनुक्रमांक ०११ ते ०१५ (दोन्हीसह) धारक रु.५०/- प्रत्येकीचे ५ पुर्णपणे भरणा केलेले शेअर्सबाबत नोंदणी क्र. टीएनएन७-००७००-२००८ नुसार दिनांक २३.०१.२००८ रोजीचे पुर्नविक्री मुळ करारनामा हरवले आहे, याबाबत दिनांक २६.०६.२०२३ रोजी नोंदणी क्र.१८४८९/२०२३ नुसार भाईंदर पोलीस ठाणे येथे एफआयआर/तक्रार नोंद केली आहे.

जर कोणास ते सापडल्यास माझ्या अशिलाकडे परत आणुन द्यावे. जर कोणा व्यक्तीस उपरोक्त मालमत्तेबाबत अधिकार, दावा, हक्क व हित असल्यास त्यांनी माझ्याकडे खाली नमुद केलेल्या पत्त्यावर योग्य दस्तावेजी पुराव्यांसह लेखी स्वरुपात सदर सूचना प्रकाशन तारखेपासून **१४ दिवसात** कळवावे. अन्यथा असे समजले जाईल की, दावा त्याग/स्थगित केले आहे.

**चार्मी के. मकवाना**
दिनांक: २७.०६.२०२३ **(वकील उच्च न्यायालय)**
कार्यालय क्र.९, १ला मजला, शिव मेघा इमारत, लाईफ लाईन केमिस्ट समोर, रामदेव पार्क रोड, मिरा रोड (पुर्व), जि. ठाणे-४०११०७.



UNITY Small Finance Bank

**युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**

**शुद्धिपत्र**

मुंबई लक्षदीप या वृत्तपत्रात २४.०६.२०२३ रोजी प्रकाशित मागणी सूचनेचा संदर्भ घेऊन

**१) अ. क्र. २ मधील १. कर्जदाराचे नाव: "मेसर्स शांती एंटरप्रायझेस त्यांचे मालकाद्वारे : श्री. ब्रम्हादेव रामराज शुक्ल" ऐवजी "मेसर्स शांती एंटरप्रायझेस त्यांचे मालकाद्वारे : श्री. ब्रम्हादेव रामराज शुक्ला" असे वाचावे.**

**२) अ. क्र. ४ कर्जदार / तारणकर्ता श्रीमती सावली सुधीर खानविलकर यांच्या मालमत्तेच्या वर्णन मध्ये क्षेत्रफळ नाव "फ्लॅट क्षेत्रफळ ४१० चौ.फुट आणि ओपन टेरेस क्षेत्र ५४ चौ.फुट" ऐवजी "फ्लॅट क्षेत्रफळ ४१० चौ.फुट कार्पेट एरिया आणि ओपन टेरेस क्षेत्र ५४ चौ.फुट" असे वाचावे.**

इतर सर्व तपशीलमध्ये कोणताही बदल नाही.

**प्राधिकृत अधिकारी**
**युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**



**जाहीर सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, माझा अशील **वलीउल्लाह इमदादुल्लाह खान,** यांचे वडील **मौलाना इमदादुल्लाह सफरुल्लाह खान,** दुकान क्रमांक **३, "ए" - विंग, तळ मजल्यावर** क्षेत्रफळ **१७०** चौ. फुट (बिल्टअप), **"मानसरोवर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड"** गाव-तुळींज, नालासोपारा (पूर्व), तालुका-वसई, जिल्हा-पालघर-४०१२०९, चे एकल मालक होते परंतु त्यांचे वडील **मौलाना इमदादुल्लाह सफरुल्लाह खान,** दिनांक **३०/०३/२००० रोजी नालासोपारा पूर्व, जिल्हा-पालघर** येथे, महाराष्ट्र राज्यातील मृत्यू झाली होती, आणि यांचा वडिलांचा मृत्यूनंतर **१) झैनब सोमैया जबी उल्लाह खान** (पत्नी) आणि **२) वलीउल्लाह इमदादुल्लाह खान,** (मुलगा) या दुकानचा जागेच्या कायदेशीर वारस आणि मालक झाल्या पण **झैनब सोमैया जबी उल्लाहखान** यांनी माझा अशील **वलीउल्लाह इमदादुल्लाह खान** च्या नावावर दुकान हस्तांतरित करण्यास तिला न हरकत दिला आहे. आणि माझा अशील **वलीउल्लाह इमदादुल्लाह खान** सदर दुकान **श्री. चंद्रेश रामचंद्र कनोजिया आणि श्री निलेश रामचंद्र कनोजिया** यांना करारनामा द्वारे दिनांक **१७/०५/२०२३** ला विकत दिलेली आहे. ज्याचा दस्त क्र.**वसई ५-७३१७/२०२३. दिनांक - १७/०५/२०२३ आहे.**

सदर मालमत्तेमध्ये कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तींकडे कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेतल्यास, भाडेकरू, भेट, गहाण ठेवल्यास ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून **१५** दिवसांच्या आत त्यांचे हक्काचे शीर्षक आणि स्वारस्य कागदोपत्री पुराव्यासह दाखवावे, असे न केल्यास कोणतेही दावे स्वीकारले जाणार नाहीत. आणि हे समजले जाईल की कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना या मालमत्तेमध्ये कोणतेही हक्क आणि स्वारस्य नाही.

**सही/- आर. एल. मिश्रा**
**दिनांक : २७/०६/२०२३** **(ॲड्व्होकेट हाय कोर्ट)**
ऑफिस नं.२३, पहिला मजला, सन शाइन हाइट्स, रेल्वे स्थानकजवळ, नालासोपारा (पूर्व), जिल्हा - पालघर - ४०१२०९.



**जाहीर सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, माझ्या अशिल **सौ. जनाबाई कृष्णा पाटील,** व त्यांचे पती **स्व. श्री. कृष्णा रामचंद्र पाटील** सदनिका क्र. **२०४,** 'ए''-विंग, दुसरा मजला यापैकी क्षेत्रफळ **५१५** चौ. फुट बिल्टअप (बांधलेले), सोसायटी चे नाव:- **न्यु मंदार को-ऑप. हौ. सो.ली.,** नालासोपारा रेल्वे स्टेशन समोर, तलाठी ऑफिस जवळ, गाव-आचोळे, नालासोपारा (पूर्व), तालुका-वसई, जिल्हा-पालघर-**४०१२०९** चे संयुक्त मालक होते पण त्यांचे पती **श्री. कृष्णा रामचंद्र पाटील** यांचा दिनांक-**०७/०३/२०२१** रोजी **मुंबई** महाराष्ट्र राज्य येथे मृत्यू झाला आहे, मृत व्यक्तीच्या मृत्यूनंतर **१) सौ. जनाबाई कृष्णा पाटील (पत्नी)** आणि **२) सौ. वंदना अमर सावंत D/o कृष्णा पाटील, (मुलगी)** आणि **३) श्री रविंद्र कृष्णा पाटील (मुलगा),** आणि **४) श्री. निलेश कृष्णा पाटील (मुलगा)** सदर सदनिकाच्या जागेचे ५०% हिस्साचे कायदेशीर वारस आणि मालक झाले ज्या हिस्साचे मालक **स्व. श्री. कृष्णा रामचंद्र पाटील** होते पण **सौ. वंदना अमर सावंत D/o कृष्णा पाटील, (मुलगी)** आणि **श्री रविंद्र कृष्णा पाटील (मुलगा),** आणि **श्री. निलेश कृष्णा पाटील (मुलगा)** त्यांचा वडिलांचा हिस्सा त्यांच्या आई म्हणजे **सौ. जनाबाई कृष्णा पाटील** यांस हस्तांतरित करण्यासाठी ना हरकत दाखला दिला आहे.

सदर मालमत्तेमध्ये कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तींकडे कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेतल्यास, भाडेकरू, भेट, गहाण ठेवल्यास ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून **१५** दिवसांच्या आत त्यांचे हक्काचे शीर्षक आणि स्वारस्य कागदोपत्री पुराव्यासह दाखवावे, असे न केल्यास कोणतेही दावे स्वीकारले जाणार नाहीत. आणि हे समजले जाईल की कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना या मालमत्तेमध्ये कोणतेही हक्क आणि स्वारस्य नाही.

**सही/- आर. एल. मिश्रा**
**दिनांक : २७/०६/२०२३** **(ॲड्व्होकेट हाय कोर्ट)**
ऑफिस नं.२३, पहिला मजला, सन शाइन हाइट्स, रेल्वे स्थानकजवळ, नालासोपारा (पूर्व), जिल्हा - पालघर - ४०१२०९.



**अंगणवाडी मदतनीस पदासाठी जाहिरात**

बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रभादेवी-शिवडी (नागरी) मुंबई या प्रकल्पासाठी अंगणवाडी मदतनिस यांची मानधनी पदे भरावयाची आहे.स्थानिक रहिवासी महिला उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे खालिल नमुद तक्त्यात दर्शविण्यात आलेली भौगोलिक स्थाने ही बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रभादेवी-शिवडी यांचे कार्यक्षेत्रात समाविष्ट आहे. नियुक्ती करीता उमेदवारांचा विचार करता उमेदवाराने नमुद केलेला पत्ता स्थानिक आहे किंवा कसे याबाबत निर्णय कार्यालयामार्फत घेण्यात येईल.सविस्तर रिक्त जागांचा तपशिल अटी व शर्ती सोबत नमुद आहेत.

**प्रकल्पातील मदतनिस रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | रिक्त जागा असलेल्या विभागाचे नाव | रिक्त पदे |
|---|---|---|
| १ | राजीव गांधी नगर फोर्टरोड,शिवडी, लालबाग राजा, काळाचौकी,कोळीवाडा शिवडी,जिजामातानगर, भाजीमार्केट काळाचौकी | ०५ |

**१).महिला व बाल विकास विभाग ,शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६ मंत्रालय मुंबई दि. २ फेब्रुवारी२०२३**

**२) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.एबावि-२०१७/प्रक्र२७९/का-६/मंत्रालय मुंबई दि.३०.११.२०१८ या शासन निर्णयानुसार दिलेल्या अटी व शर्तीनुसार संबंधित रिक्त पदे भरावयाची आहे.**

**३) मा.आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना,जा.क्र.एबाविसेयो/का-७/अंगणवाडी कर्मचारी भरती/२०२३-२४/१९२४दि.२७.४.२०२३**

**पात्रतेचे निकष**

| अ.क्र | तपशील | अगणवाडी मदतनिस |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक पात्रता | १२ वी पास किंवा अधिक |
| २ | वयोमर्यादा | १८ ते ३५ वर्ष, उमेदवार विधवा असल्यास वयोमर्यादा अट कमाल ४० वर्ष अशी आहे (अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास ) |
| ३ | एकत्रित म ानधन | शासनामार्फत निश्चित करण्यात आलेले |
| ४ | एकुण रिक्त पदे | ०५ |

**अर्जाचा नमुना कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहिल. अर्ज मिळण्याचे व जमा करण्याचे ठिकाण --बालविकास प्रकल्पअधिकारी प्रभादेवी-शिवडी (नागरी) मुंबई**
११७ बी.डी.डी. चाळ,पहिला मजला, वरळी, मुंबई-४०००३०.

अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक जाहिरात प्रसिध्द केल्यापासुन १० कार्यालयीन कामकाजाचे दिवस

ईश्वर गोयर,
बालविकास प्रकल्प अधिकारी,
प्रभादेवी-शिवडी (नागरी) .
मुंबई

आरओसी-२०२३-२४/क्र.-५/सी१७१३



FEDBANK

**फेडबँक फायनान्शियल सर्विसेस लिमिटेड**

त्यांचे कॉर्पोरेट कार्यालय : कनाकिया वॉल स्ट्रिट, ए-विंग, ५वा मजला, युनिट क्र.५०१, ५०२, ५११, ५१२, अंधेरी कुर्ला रोड, चकाला अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र-४०००९३.

**ताबा सूचना**

ज्याअर्थी; खालील स्वाक्षरीकर्ता हे सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सेकण्ड) ॲक्ट २००२ (कायदा ५४/२००२) अंतर्गत फेडबँक फायनान्शियल सर्विसेस लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचिता कलम १३(१२) अन्वये असलेल्या अधिकाराअंतर्गत त्यांनी दिनांक २७ मार्च २०२३ रोजी वितरीत केलेल्या मागणी सूचनेनुसार कर्जदार, तारणकर्ता, सह-कर्जदार आणि जामिनदार : (१) अफाक अहमद शेख (कर्जदार), (२) रिझवाना अफाक अहमद शेख (सह-कर्जदार) यांना सदर सूचना प्राप्त तारखेपासून ६० दिवसांच्या आत देय रक्कम **रु.२३,८५,५३७/- (रुपये तेवीस लाख पंच्याऐंशी हजार पाचशे सदतीस फक्त) दि.२७.०३.२०२३ रोजी कर्ज खाते क्र.एफईडीकेसीएस०एचएल०४९१३७१** कराराच्या दराने ज्यावरील पुढील व्याज तसेच सर्व खर्च शुल्क आणि अनुषंगिक खर्च जमा करण्यास सांगण्यात आले होते.

कर्जदार, तारणकर्ता, सह-कर्जदार आणि जामिनदार यांनी वर नमूद केलेली रक्कम भरण्यास असमर्थ ठरले असून कर्जदार, तारणकर्ता, सह-कर्जदार आणि जामिनदार व सर्वसामान्य जनतेस येथे सूचित करण्यात येत आहे की, खालील स्वाक्षरीकर्त्यांनी खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा ताबा कायद्याच्या कलम १३(४) सहवाचिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये **२१ जून २०२३** रोजी घेतलेला आहे.

कर्जदार, तारणकर्ता, सह-कर्जदार आणि जामिनदार व सर्वसामान्य जनतेस येथे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तेसह कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेसह व्यवहार केलेला असल्यास त्यांनी फेडबँक फायनान्शियल सर्विसेस लिमिटेड यांच्याकडे थकबाकी रक्कम **रु.२३,८५,५३७/- (रुपये तेवीस लाख पंच्याऐंशी हजार पाचशे सदतीस फक्त) दि.२७.०३.२०२३ रोजी कर्ज खाते क्र.एफईडीकेसीएस०एचएल०४९१३७१** कराराच्या दराने ज्यावरील पुढील व्याज तसेच सर्व खर्च शुल्क आणि अनुषंगिक खर्च जमा करण्यास सांगण्यात आले होते.

कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे की, कायद्याच्या कलम १३ चे उपकलम (८) च्या तरतूदीनुसार प्रतिभूत मालमत्ता सोडविण्यासाठी वेळ उपलब्ध आहे.

**अनुसूची - १**
**तारण मालमत्तेचे वर्णन**

फ्लॅट क्र.३०१, ३रा मजला, फ्लॅटचे क्षेत्रफळ सुमारे ६५२ चौ. फूट बिल्ट अप क्षेत्र, समतुल्य ६०.५९ चौ.मी. अब्दुल्लाह मॅन्शन या नावाने अधिक प्रचलित आहे, जो सर्व्हे क्रमांक ६९ हिसा क्रमांक बी भाग, भूखंड क्रमांक १, गाव नगाव-१, तालुका - भिवंडी, जिल्हा. ठाणे, निजामपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीत, नागाव, भिवंडी येथे वसलेला आहे येथील जागेचे सर्व भाग व खंड.

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी,**
**फेडबँक फायनान्शियल सर्विसेस लिमिटेड**

**दिनांक : २७.०६.२०२३**
**ठिकाण: ठाणे**